प्रेसनोट दि.२०.०६.२०१९

शिर्षक :- सतिश गोविंदराव खाडे, ग्रामसेवक, सावळी ग्रामपंचायत आणि अशोक नागेश नाईक, क्लार्क, ग्रामपंचायत सावळी, ता. मिरज, जि.सांगली यांना २५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले, सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | एम.आय.डी.सी.कुपवाड पोलीस स्टेशन, गुरनं ११४/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| अरोपीचे नाव व कार्यालय | १)सतिश गोविंदराव खाडे, वय ३५ वर्षे, ग्रामसेवक, सावळी ग्रामपंचायत रा. दत्तगुरु सहनिवास,स्टेट बँक कॉलनी, अभयनगर, सांगली वर्ग- ३<br>२)अशोक नागेश नाईक, वय ३४ वर्षे, ग्रामपंचायत सावळी येथील क्लार्क, रा. विठ्ठल पाटील हायस्कुल मागे, सावळी, ता. मिरज, जि.सांगली |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीचा बांधकाम परवाना आवश्यक होता. तक्रारदार यांनी ग्रामपंचायत सावळी येथे बांधकाम परवाना मागणीचा अर्ज आवश्यकत्या कागदपत्रांसह दिला होता. तक्रारदार यांनी बांधकाम परवान्यासाठी सावळी ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक श्री. खाडे यांची भेट घेतली असता खाडे यांनी तक्रारदार यांना बांधकाम परवाना देण्यासाठी ३०००/- रुपये लाचेची मागणी केली असलेबाबत तक्रारदार यांनी दि. १७.६.२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि. १८.६.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये श्री.सतिश गोविंदराव खाडे, वय ३५ वर्षे, ग्रामसेवक आणि अशोक नागेश नाईक, वय ३४ वर्षे, क्लार्क, ग्रामपंचायत सावळी, यांनी तक्रारदार यांचेकडे चर्चेअंती २५००/-रुपये लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि. १९.६.२०१९ रोजी ग्रामपंचायत सावळी येथे सापळा लावला असता ग्रामसेवक श्री.सतिश गोविंदराव खाडे, ग्रामसेवक, सावळी ग्रामपंचायत यांनी तक्रारदार यांचेकडे २५००/- रुपये लाचेची मागणी करुन २५००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द व श्री. अशोक नागेश नाईक, वय ३४ वर्षे, क्लार्क, ग्रामपंचायत सावळी, ता. मिरज, जि. सांगली यांचे विरुध्द एम.आय.डी.सी.कुपवाड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार अॅप :- **acbmaharashtra.net**
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सअॅप क्रमांक :- ९८२३६१८००१

(राजेंद्र साळुंखे)
पोलीस उप-अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली